# ग्रामपंचायत कार्यालय शिरशाठे
# ता. ईगतपुरी व जि. नाशिक

जाहीर ई- निविदा सूचना क्र.०१/२०२४-२५ (ऑनलाईन)

ग्रामपंचायत शेणवड बु ता. ईगतपुरी जि- नाशिक येथे होणाऱ्या कामाकरीता ई- निविदा पध्दतीने इ निविदा मागवीत आहे. सदर निविदा शासनाच्या *http://mahatender.gov.in* या संकेतस्थळावर डाउनलोड करता येईल या निविदा संबधित सर्व माहिती व अटी/ सर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. हि निविदा फक्त ऑनलाईन पद्धतीनेच दाखल करता येईल. निविदा फी व इसारा रक्कम हि ऑनलाईन स्वरुपात भरावयाची आहे. सर्व ठेकेदार यांनी Digital singnature असणे व रीनिवल करणे आवश्यक आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे या बाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत शिरशाठे ता. ईगतपुरी जि.नाशिक यांचे राहतील.

| अ क्र | कामाचे नाव | कामाची रक्कम | बयाना रक्कम | फी | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | Construction of cement concrete road(Panchshil Nagar) Shirshathe tal igatpuri dist nashik | 1199000/- | 12000/- | 500/- | खुला वर्ग |

१ ) सदर संपुर्ण निविदा प्रक्रिया ई - निविदाद्वारे ऑनलाइन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल . सदर निविदेसंदर्भात निविदा नोटीस प्रसिध्दी, सुचना, शुध्दीपत्रके इत्यादी माहीती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे .

२ ) वरिल कामाची निविदा प्रपत्रे http://mahatenders.gov.in या संकेतस्थाळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे, अटी, शर्ती इ. सदर संकेत स्थळावरून दि १५/०५/२०२६ सकाळी ९ वा. ते दिनांक २१/०५/२०२६ दुपारी ५.०० वा. पर्यंत अधिग्रहित ( DOWNLOAD ) करता येतील.

३ ) वरिल कामाच्या निविदा http://mratenders. दि १५/०५/२०२५ सकाळी ९ वा. ते दिनांक २१/०५/२०२६ दुपारी ५.०० वा. पर्यंत इलेक्ट्रॉनिक फॉरमॅटमध्ये ऑनलाइन पध्दतीने सादर करता येतील, तांत्रिक व आर्थिक लिफाफे शक्यतो दिनांक २२/०५/२०२६ दुपार ५.०० वा. नंतर ग्रामपंचायत कार्यालय अथवा पंचायत समिती कार्यालय येथे उघडण्यात येथील अथवा पुढे ढकलण्यात येईल.

४ ) ई निविदेमधील अटी व शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदांपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखुन ठेवला आहे. ई निविदा भरणा-या कोणत्याही ठेकेदारास ई निविदा फेटाळल्याबाबत स्पष्टीकरण मागता येणार नाही. तसेच एखाद्या कामाची निकड लक्षात घेता निविदेतील त्या कामासाठी एखादी अट शिथिल करण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखुन ठेवला आहे .

**ई निविदी संदर्भातील इतर अटी व शर्ती**

१ ) ठेकदारांनी दोन लिफाफा पध्दतीने ई निविदा सादर करणे गरजेचे आहे .

२ ) कंत्रटदारांनी कामाचे नकाशे निविदेतील अटी व शर्ती बाबनिहाय कामाचे स्थळ, मजुर उपलब्धता या सर्व बाबींचा अभ्यास करून निविदा सादर करावयात.

३ ) लिफाफा क्रमांक १ मधील सर्व कागदपत्रांचा छाननी करून लिफाफा क्र .१ मध्ये पात्र ठरलेल्या ठेकेदाराचाच लिफाफा क्र .२ उपडणेत येईल.

४ ) कोणत्याही अटीवर आधारीत असलेल्या ई निविदा स्विकारल्या जाणार नाही अथवा स्विकारल्या तरीही त्या मंजुर केल्या जाणार नाही.

५ ) मक्तेदारांनी सादर केलेली ई निविदा व त्या निविदेमधील दर लिफाफा क्र .२ उघडल्यानंतर ९० दिवसापर्यंत वैध राहतील. (कंत्रटदाराचा देकार ९० दिवस राहिल)

६ ) सदर कामाचा राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयक अदा करण्यात येइल.

७ ) अंदाजपत्रक दरापेक्षा कमी दराच्या निविदा भरल्यास शासन निर्णय क्रं.बीडीजी २०१६ / प्रक्रं .२ / इमा .२ / मंत्रालयमुंबई ४०००३२ दि . १२/०२/२०१६ नुसार १० टक्के पर्यंत कमी दर भरल्यास १ टक्के विशेष सुरक्षा ठेव तसेच १० टक्यापेक्षा जेवढ्या दराने कमी आहे त्याच्या प्रत्येक टक्यास १ टक्का ( उदा . १४ टक्के कमी दर असल्यास १० टक्यापर्यंत १ टक्का व वरिल ४ टक्यास ४ टक्के असे एकुण ५ टक्के ) रक्कमेची बँक गॅरंटी अथवा धनाकर्ष ग्रामपंचायत प्रतापगड ता. सुरगाणा नाशिक या नावाने यांचे नावे विशेष सुरक्षा ठेव म्हणुन काढण्यात यावा व तो सरकारी ग्रामपंचायत बैंक शाखा येथे देय असलेला असावा. धनाकर्षावर MICRO व IFSC कोड असणे आवश्यक आहे . निविदा उघडल्या नंतर L1 निविदा धारकाने धनाकर्ष निविदा उघडल्या नंतर च्या दिनांकापासुन ८ कार्यालयीन दिवसात ग्रामपंचायत प्रतापगड ता. सुरगाणा जि . नाशिक यांचे कार्यालयात सदरचा धनाकर्ष समक्ष लिफाफ्यामध्ये सिलबंद करून जमा करावी, सदर लिफाफ्यावर कामाचे नाव, ठेकेदाराचे नाव, ठेकेदाराचा पुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक नोंद करावी, विहीत मुदतीत ज्या ठेकेदाराचा धनाकर्ष कार्यालयात प्राप्त होणार नाही अथवा चुकीचा धनाकर्ष जमा केल्यास अशा ठेकेदाराची भरलेली ई निविदा नामंजुर करण्यात येईल. तसेच धनाकर्षाची मुदत निविदा भरण्याच्या दिनांकानंतर किमान ३ महिने पर्यंत असणे आवश्यक आहे . तसेच सदरचा धनाकर्ष हा ई निविदा प्रसिध्द झालेल्या दिनांकाचा अथवा त्यानंतरचा असावा.

८ ) १ जुलै २०१७ नंतर शासनाने शासकिय कंत्राटावर जीएसटी कर लागु केलेला असल्याने सदर निविदा रकमेवर नियमाप्रमाणे जीएसटी कराची आकारणी केली जाणार आहे . त्यामुळे सदर निविदेची दर नमुद करतांना कंत्राटदार यांनी जीएसटीचा विचार करून निविदेचे दर नोंद करावेत, तसेच कामाचे देयक आदा करतांना शासकिय नियमाप्रमाणे कपात कराव्या लागणा - या सर्व रक्कमा नियमाप्रमाणे कपात करण्यात येतील.

९ ) निविदेमधील सर्व वा कोणतेही अटी व शर्ती पुर्ण न करणा - या कंत्राटदाराची निविदा वा अर्धवट सादर केलेल्या निविदा अपात्र समजल्या जातीत.

१०)ज्या ठेकेदाराची ई निविदा मंजुर होईल त्याने एकुण ५ टक्के इतकी सुरक्षा अमानत ग्रामपंचायतीकडे भरणा करावी लागेल. (ई निविदा म.स.म. किंवा मुशिक्षित बेरोजगारांना राखीत असलेस एकुण सुरक्षित ठेव २.५ टक्के) त्यापैकी निविदा मंजुरीनंतर सात दिवसाच्या आत २.५० टक्के रक्कम ग्रामपंचायतीकडे जमा करावी व उर्वरीत २.५० टक्के रक्कम कामाच्या पहिल्या देयका वेळी कपात करून घेतली जाईल . प्रथम सुरक्षा ठेव रक्कम १.२५ टक्के रक्कम जमा केल्याशिवाय करारनामा अथवा कार्यारंभ आदेश दिला जाणार नाही. विहीत मुदतीत सुरक्षा ठेव ग्रामपंचायतीकडे मक्तेदाराने जमा न केल्यास अथवा काम करणेस नकार दिलेस सदर मक्तेदाराम कामाची गरज नाही असे समजुन त्यांची मंजुरी झालेली ई निविदा नामजुर करणेत येईल व सदर मक्तेदाराची बयाना रक्कम जप्त करून आपली तक्रार वरीष्ठस्तरावर करण्यात येईल. यानंतर व्दितीय निम्न दराच्या मक्तेदाराम प्रथम निम्न स्थर दराने काम करणेची संधी देणेत येईल.

११) शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र . पसस/ १००१ / प्र.क्र .४०/ जल / दिनांक १०१०/२००१ अन्वये मक्तेदाराकडुन वसुल केलेली सुरक्षा अनामत रक्कम दोष दायीत्व कालावधासाठी ०६ महिने ग्रामपंचायती कडे राखुन ठेवणेत येईल . सदरचा दोष दायित्व कालावधी समाप्तीनंतरच मक्तेदारास परत केली जाईल. तसेच सदर रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज ग्रामपंचायतीकडुन देय असणार नाही.

१२ ) सदरच्या निविदा नोटीस मधील अटी व शर्तीशिवाय इतर आवश्यक त्या अटी व शर्तीचा सामावेश प्रत्यक्ष करारनामा करतांना करणेत येईल.

१३ ) सदर ई निविदेबाबत कोणताही तंटा अगर वाद निर्माण झाल्यास त्याबाबतकोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही. याबाबत ग्रामपंचायतीचा निर्णय अंतीम राहील .

१४ ) ई निविदा प्रक्रियासंदर्भात संगणीकृत ई प्रणालीव्दारे भ्रमणध्वनीवर संदेश पाठविला जातो. तसेच काही वेळा संदेश प्राप्त झाला नाही तरीही ऑनलाईन ई निविदा कार्यवाही प्रक्रिया पाहण्याची जबाबदारी संबंधीत निविदा धारकाची रहिल या बाबत या कार्यालयाकडुन स्वतंत्रपणे कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.

१५ ) निविदा कोणत्याही टप्यावर अथवा निविदा मंजुरीनंतर कामाच्या कोणत्याही टप्यावर कागदपत्राचा विधी आक्षेप नोंदविला गेला तर हि बाब कायदेशिर अथवा फौजदारी कार्यवाहीस पात्र राहिल. मक्तेदारावर सोपविलेल्या कंत्राटकामाचा विमा कंत्राटदाराने विमा संचालनालय महाराष्ट्र राज्या गृहनिर्माण भवन २६४ , पहिला मजला , कला नगर , बांद्रा ( पुर्व ) मुबई ४०००५१ ( दुरध्वनी क्रमांक संचालक २६५ ९९ ७८२ / २६५ ९ ०४० I कार्यालय २६५ ९ ०६०४२६५ ९ ०७४६ फैक्स क्र . ०२२ - ६५ ९ ०२४६१ ) या कार्यातयापाशी कंत्राटाचा नपुर्ण विमा उतरविणे बंधनकारक आहे . तसेच सदरचे कंत्राटी काम पुर्ण करण्यासाठी नियुक्त करणेत येत असलेल्या सर्व कामगाराचा विमा कामगार नुकसान भरपाई विमा अटी व शर्ती नुसार उतरविणे अनिवार्य आहे . विमा संचालनलायच्या व्यतीरिक्त अन्य विमा कंपन्याकडुन घेतलेली विमा पत्रे स्विकारली जाणार नाही.

१६) जे कंत्राटदार कंत्राटी कामाचा विमा उपरोक्त कार्यालयाकडुन घेणार नाही तसेच या कार्यालयाकडुन येणार नाहीत तसेच या कार्यालयास विमा पॉलिसी घेतल्याचा पुरावा सादर करणार नाहीत किंवा जे कंत्राटदार कार्यारंभ आदेश घेताना कंत्राटी कामाच्या नियमाप्रमाणे ०.५० टक्के अथवा १ टक्के रकमेचा धनाकर्ष देऊन विमा पत्र घेणार नाहीत, अशा कंत्राटदाराधा प्रथम देयकापासुन नियमाप्रमाणे ०.५० टक्के अथवा १ टक्के रक्कम विमा हफ्ता अथवा किमान विमा हमा रू २२६/ - यापैकी जी जास्त असेल ती वसुल करणेत येईल व विमा पत्राच्या अटी व शर्तीनुसार उपरोक्त कार्यालयाकडुन कार्यवाही करण्यात येईल.

**१७) स्थळ पाहणी दाखला, ग्रामपंचायत यांच्याकडे काम प्रलंबित नसल्याचा दाखला,सदर कामाच्या जागेचे Geotag फोटो अनिवार्य आहे**

**अ) तांत्रीक लिफाफा लिफाफा क्र . १**

१. इसारा व बयाना
२. जिल्हा परिषद नोंदणी प्रमाणपत्र,
३. पॅन कार्ड.
४. वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र
५. व्यवसाय कर प्रमाणपत्र व व्यवसाय कर ३१.०३.२०२५ पर्यंत भरल्याची पावती.
६. मागील तीन आर्थिक वर्षाचे आयकर प्रमाणपत्र.
७. प्रतिज्ञापत्र.५०० रु च्या मुद्रांक वरती (Affidavit or Notary)
८. सदस्य मजूर कामगार यांचा अद्यावत विमा प्रमाणपत्र.
९. मागील तीन आर्थिक वर्षीच्या आतील कामाचे पूर्णत्वाचे दाखले व अपूर्ण असलेले कामांचे कार्यरंभ आदेश.
१०. मा. सरपंच यांचा कोणतेही काम प्रलंबित नसल्याचा दाखला व स्थळाचे geotagging फोटो सरपंचाचा सही सहित उपलोड करावे.
    वरील सर्व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे,त्या कारणे निविदा रद्द होऊ शकते.

**ब ) आर्थिक लिफाफा / लिफाफा क्र . २**

**१.** BOQ

• ठेकेदाराने आपले दर विहीत BOQ मध्ये योग्य त्या जागी भरणा करून सदरची BOQ अपलोड करावी. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष निविदेचे दर इतर कोठेही नमुद करू नय

**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत शिरशाठे ता. ईगतपुरी जि.नाशिक**

**सरपंच**
**ग्रामपंचायत शिरशाठे ता. ईगतपुरी .जि.नाशिक**

Signature Not Verified
Digitally signed by DNYANOBA BABURAO RANER
Date: 2026.05.14 13:39:07 IST
Location: Maharashtra-MH